GRAVISS
HOSPITALITY
QUALITY·PASSION·INNOVATION

01st September, 2023

To,
BSE Limited,
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street,
Mumbai- 400001.

**Scrip Code: 509546**

**Sub: Newspaper publication regarding Notice of the 62nd Annual General Meeting of the Members of the Company scheduled to be held on Wednesday, September 27, 2023 at 12:30 P.M. ("IST")**

Dear Sir/Madam,

This is to inform you that pursuant to Regulation 47 SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulation 2015, the Company has published the newspaper advertisement with regard to captioned subject for pre and post dispatch of Annual Report on August 29, 2023 and September 01, 2023, respectively, in the requisite newspapers.

Copy of the newspaper publications are enclosed herewith.

The Notice of the 62nd Annual General Meeting of the Company is also available on the website of the Company at https://www.gravisshospitality.com

This is for your reference and records.

Thanking You,
Yours Faithfully,

**For GRAVISS HOSPITALITY LIMITED,**

JALPA GAUTAM MODI
Digitally signed by JALPA GAUTAM MODI
Date: 2023.09.01 12:40:51 +05'30'

GRAVISS HOSPITALITY LTD. ★

**Jalpa G. Modi**
**Company Secretary & Compliance Officer**
Encl: As Above

# रक्षाबंधन करून परतताना अपघात; सहा वर्षांच्या चिमुरडीसह दाम्पत्य गंभीर



**उंब्रज / वार्ताहर :** पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर वहागाव (ता. कराड) गावच्या हद्दीत रक्षाबंधन करून परतत असणाऱ्या दुचाकीधारकाला दुसऱ्या वाहनाने हुलकावणी दिल्याने झालेल्या अपघातात दुचाकीवरील दांपत्यासह त्यांची सहा वर्षांची बालिका जखमी झाली. महामार्गावर रस्ते कंपनी ठेकेदाराने ठेवलेल्या सिमेंट ब्लॉकला दुचाकी धडकल्याने हा अपघात झाला. त्यामुळे वाहनधारकांनी संबंधित रस्ते कंपनीच्या निष्काळजीपणाबद्दल संताप व्यक्त केला..

याबाबत घटनास्थळावरून मिळालेली माहिती अशी, पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर कराडहून साताऱ्याच्या दिशेला निघालेली दुचाकी रस्त्यावरील सिमेंट ब्लॉकला धडकल्याने अपघात झाला. या अपघातात एक सहा वर्षांची बालिका व दांपत्य गंभीर जखमी झाले. हे सर्वजण सातारा तालुक्यातील देवकरवाडी येथील असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.

दरम्यान, कोल्हापूरहून पुण्याला निघालेल्या एनडीआरएफ जवानांनी जखमींवर प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी हलविण्यासाठी मदत केली. एनडीआरएफ जवानांनी प्रथमोपचार केल्याने बालिकेला वेळेत उपचार मिळाले. अपघातातील कुटुंबाला घटनास्थळी एनडीआरएफच्या टीमने मोलाची मदत केली. यावेळी महामार्ग पोलिस विभागाचे पोलीस उपनिरीक्षक जावेद कराडकर यांच्यासह त्यांचे पोलीस सहकारी तसेच तळबीड पोलीस ठाण्याचे कॉन्स्टेबल प्रवीण फडतरे व ग्रामस्थांनी यांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना मदत केली.

# धरणातील पाणी पिण्यासह शेतीसाठी राखून ठेवा : पालकमंत्री शंभूराज देसाई



**सातारा / प्रतिनिधी :** सातारा जिल्ह्यात सरासरी पेक्षा कमी पाऊस झाला आहे. संभाव्य टंचाई पाहता धरणांतील उपलब्ध पाणीसाठा हा प्राधान्याने पिण्याच्या पाण्यासाठी व शेतीसाठी राखून ठेवावा त्याचबरोबर कालावा सल्लागार समितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणेच धरणांमधील पाण्याचे आर्वतन सोडावे, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात कालवा सल्लागार समितीची बैठक पालकमंत्री देसाई यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी ते बोलत होते. बैठकीला खा. श्रीनिवास पाटील, आ. बाळासाहेब पाटील, आ. अनिल बाबर, आ. श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले, आ. जयकुमार गोरे, आ. दीपक चव्हाण, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पोलीस अधीक्षक समीर शेख, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले, पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता अरुण नाईक, उपजिल्हाधिकारी विजया यादव, शाखा अभियंते यांच्यासह कालवा सल्लागार समितीचे सदस्य उपस्थित होते.

धरणांमधून पाण्याचे आर्वतन सोडताना लोकप्रतिनिधींच्या सूचनेचाही विचार करावा, अशा सूचना करुन पालकमंत्री देसाई म्हणाले, जिल्ह्यातील ज्या उपसा सिंचन योजना गळती लागली आहे. ती गळती काढण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी पाटबंधारे विभागाची लवकरात-लवकर बैठक घ्यावी. त्याचबरोबर तारळी प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांबाबत बैठक घ्यावी.

कालव्यामधून जे पाणी सोडले जाते ते शेवटच्या शेतकऱ्यांच्या शिवारापर्यंत पोहचले पाहिजे याची दक्षता घ्यावी. कोयना धरण अद्याप पूर्ण क्षमतेने भरलेले नाही. त्यामुळे पिण्याचे पाण्याचे पुनर्नियोजन करावे. उरमोडी व कण्हेर धारणांमधील सातारा शहरासाठी पाणी राखीव ठेवावे. कालव्याद्वारे पाणी सोडल्यानंतर पाणी वळविण्यासाठी कालवे फोडणाऱ्यांवर पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी गुन्हे दाखल करावे. तसेच पोलीस विभागाने गुन्हे झालेल्या व्यक्तींवर कडक करवाई, अशा सूचना पालकमंत्री देसाई यांनी बैठकीत केल्या.

# विद्यानिकेतनच्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्थरिय स्पर्धेत यश



**इस्लामपूर / प्रतिनिधी :** सांगली येथे शनिवारी दि १९ ऑगस्ट रोजी झालेल्या जिल्हास्तरीय ज्युनिअर स्पर्धेमध्ये कासेगाव शिक्षण संस्थेच्या विद्यानिकेतन इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे. स्कूलमधील २१ खेळाडूंची राज्यस्तरीय ज्युनिअर मैदानी स्पर्धेमध्ये निवड झाली आहे.

१४ वर्षे वयोगट मुलांमध्ये आदित्य खिलारी याने उंच उडी या क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक, अभिनव शिंदे याने द्वितीय क्रमांक, वेदांत पाटील याने तृतीय क्रमांक मिळविला. यशराज पाटील याने लांब उडीमध्ये प्रथम क्रमांक, रणवीर पवार याने गोळा फेकमध्ये तृतीय क्रमांक मिळविला. आदित्य खिलारी याने धावणे स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक मिळविला. १४ वर्षे मुलीमध्ये उंच उडी या क्रीडा प्रकारात शौर्या पाटील हिने प्रथम क्रमांक पूर्वा पाटील हिने द्वितीय क्रमांक मिळविला.

१६ वर्षे मुलांमध्ये तेजस राजमाने याने १०० मीटर धावणे मध्ये प्रथम क्रमांक, उंच उडी या क्रीडा प्रकारात शुभम यमगर याने प्रथम क्रमांक, तेजस राजमाने याने तृतीय क्रमांक मिळविला. थाळीफेक या क्रीडा प्रकारात अली मुल्ला याने प्रथम क्रमांक, स्वराज यमगर याने द्वितीय क्रमांक, विश्वजीत साळुंखे याने तृतीय क्रमांक मिळविला. गोळा फेक या क्रीडा प्रकारात आली मुल्ला याने द्वितीय क्रमांक, विश्वजीत साळुंखे याने तृतीय क्रमांक मिळविला.

१६ सोळा वर्षे मुलींमध्ये पूर्वा मोहिते हिने थाळी फेक या क्रीडा प्रकारात थाळी फेकून प्रथम क्रमांक, तनिष्का शेजवळे हिने तृतीय क्रमांक मिळविला. गोळा फेक या क्रीडा प्रकारात पूर्वा मोहिते हिने तृतीय क्रमांक मिळविला. ३०० मीटर व १०० मीटर धावणे या क्रीडा प्रकारात अनुष्का पाटील हिने तृतीय क्रमांक मिळविला.

१८ वर्षे वयोगट मुलांमध्ये थाळीफेक या क्रीडा प्रकारात सोहम थोरात याने द्वितीय क्रमांक, संचित कदम याने तृतीय क्रमांक मिळविला. गोळा फेक या क्रीडा प्रकारात सोहम थोरात यांनी तृतीय क्रमांक मिळविला. १८ वर्षे वयोगट मुलींमध्ये उंच उडी या क्रीडा प्रकारात दर्शना जाधव हिने प्रथम क्रमांक, २० वर्षे वयोगट मुलांमध्ये आर्य शहा याने थाळीफेक या क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक, अवधूत पाटील याने द्वितीय क्रमांक मिळवला. अथर्व शेजावळे याने तृतीय क्रमांक मिळविला. गोळा फेक या क्रीडा प्रकारात अवधूत पाटील यांनी द्वितीय क्रमांक,आर्य शहा यांनी गोळा फेकून तृतीय क्रमांक मिळविला.

२० वर्षे वयोगट मुलींमध्ये उंच उडी या क्रीडा प्रकारात श्रावणी देसावळे हिने उंचउडी घेऊन प्रथम क्रमांक मिळविला. २१ खेळाडूंची निवड ही पुणे व डेरवण येथे होणाऱ्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या सर्व खेळाडूंना क्रीडा शिक्षक विजयकुमार शिंदे व विकास ताटे यांचे मार्गदर्शन लाभले. कासेगाव शिक्षण संस्थेचे सचिव प्रा. आर. डी. सावंत, अधीक्षक ए. डी. पाटील, प्राचार्य युवराज काटकर व उपप्राचार्य अजित पाटील यांनी खेळ अभिनंदन केले.

# आयडीबीआय ग्रामीण प्रशिक्षण संस्थेत माजी प्रशिक्षणार्थींचा संवाद मेळावा संपन्न

**सातारा / प्रतिनिधी :** आयडीबीआय ग्रामीण प्रशिक्षण संस्था (आरसेटी) सातारा यांच्या वतीने संस्थेत प्रशिक्षण घेऊन आपला व्यवसाय यशस्वीपणे सुरु करणाऱ्या माजी प्रशिक्षणार्थींचा संवाद मेळावा नुकताच झाला. यावेळी जिल्हा कारागृह अधीक्षक शमाकांत शेडगे, काटदरे उद्योग समूहाचे व्यवस्थापक पराग काटदरे, आयडीबीआय आरसेटीचे संचालक प्रशांत पाटील उपस्थित होते.

आरसेटीच्या उपक्रमाचे कौतुक करुन नव उद्योजकांनी नवनव्या संधी शोधून आपल्या समस्यांतून मार्ग काढावा व यशस्वी उद्योजक व्हावे, असे जिल्हा कारागृह अधीक्षक शेडगे यांनी यावेळी सांगितले.

आपल्या मनोगतात काटदरे उद्योग समूहाचे काटदरे यांनी आपले उद्योजकीय अनुभव सांगताना सुरुवातीस छोट्या प्रमाणात उद्योगाची सुरुवात करून त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून सतत आपल्या उद्योगाची वाढ करावी, असे सांगितले.

आयडीबीआय आरसेटीचे संचालक पाटील यांनी या संवाद मेळावा आयोजित करण्यामागची भूमिका विशद करताना संस्थेतील प्रशिक्षित नव उद्योजकांना आपल्या अनुभवाची देवाणघेवाण करता यावी. आपल्या व्यवसायाशी निगडित पूरक माहिती घेता यावी हा या संवादमेळाव्याचा उद्देश असल्याचे प्रस्ताविकात सांगितले.

मेळाव्यात आरसेटीचे प्रशिक्षक सुहास साळुंखे यांनी आरसेटीच्या गुरुदक्षिणा या उपक्रमाची माहिती दिली व अधिकाअधिक गरजूंपर्यत हा उपक्रम पोहचविण्याचे आवाहन केले. या संवाद मेळाव्यासाठी उपस्थित असणाऱ्या नव उद्योजकांनी आपले उद्योजकीय वाटचालीतील अनुभव व्यक्त केले. तसेच आयडीबीआय आरसेटीच्या या उपक्रमाचे कौतुक करून या संवाद मेळाव्यातून त्यांना खूपच फायदा झाला आहे. असा मेळावा आरसेटीने नियमित आयोजित करावा, अशी विनंती केली. या संवाद मेळाव्याच्या यशस्वितेसाठी आयडीबीआयचे अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सागर मलगुंडे पुन्हा जिल्हास्तरीय वृध्द कलाकार मानधन समितीवर



**इस्लामपूर / प्रतिनिधी :** शिवसेना भाजप युती शासनाच्या कार्यकाळात जिल्हास्तरीय समित्यांवर निवडी पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्या शिफारशीनुसार सुरु आहेत. उशीरा का होईना पण सर्वच समित्यांवर दोन्हीकडून पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांच्या नावांच्या याद्या शिफारसी गेल्या आहेत. शिवसेना जिल्हा प्रमुख आनंदराव पवार व महेंद्र चंडाळे यांच्याकडून कलाकार मानधन समितीवर पुन्हा एकदा मागील कार्यकाळातले काम पाहता सागर मलगुंडे यांच्याच नावाची शिफारस केली.

मागील महाविकास आघाडी सरकारच्या काळात सागर मलगुंडे हे सदस्य म्हणून कार्यरत होते. त्यावेळी तत्कालीन जिल्हा परिषदेचे धडाकेबाज अधिकारी चंद्रकांत गुडेवार यांच्याकडे मागणी करुन कलाकार मानधन समितीचा कारभार पारदर्शक होण्यासाठी तालुकानिहाय कलाकारांकडून सादरीकरण करण्यात यावेत. समिती सादरीकरण बघून योग्य तो निर्णय घेईल, असा प्रयोग करण्यात आला. तो प्रयोग संपूर्ण राज्यभर चर्चेचा ठरला. कलाकारांकडून एकही नवा पैसा न घेता बदनाम असलेली समिती अनोख्या कार्यपध्दतीने नावारूपास आणली. आताही त्याच पध्दतीने काम करुन वयोवृध्द कलाकारांना न्याय देण्याची माझी भुमिका राहील. तसेच यावेळेसही नव्याने झालेल्या समितीवर ज्येष्ठ मान्यवर आहेत. परंतू त्यांच्याकडूनही कलाकारांवर अन्याय किंवा फसवणूक अर्थिक त्रास होणार नाही. अशी एक सदस्य म्हणून माझी स्पष्ट भूमिका राहील, असे सागर मलगुंडे यांनी सांगितले.

# जत येथे रक्षाबंधन दिवशी महिला स्वच्छतागृहासाठी भिकमागो आंदोलन




**जत / प्रतिनिधी :** जत शहरात एकही स्वतंत्र महिला स्वच्छतागृह नाही. स्वतंत्र महिला स्वच्छतागृह सुरु करण्यासाठी भाजी विक्रेत्या महिलांकडे भीक मागून होणारा निधी जिल्हाधिकाऱ्यांकडे मनीऑर्डरने पाठवण्यासाठी विक्रम ढोणे यांनी भिकमाग आंदोलन केले. या अनोखे व हटके आंदोलनाचे जत तालुक्यात चर्चा सुरू आहे.

यावेळी ढोणे म्हणाले, गेली पाच वर्षे आम्ही शहरात स्वतंत्र महिला स्वच्छतागृह सुरु करण्यासाठी नगरपालिका प्रशासनाला निवेदन देतो, आंदोलन करतो. नगरपालिकेत महिला नगराध्यक्ष आणि ५०% महिला प्रतिनिधी असतानाही शहरात एकही स्वतंत्र महिला स्वच्छतागृह नाही. हे समस्त महिला भगिनिंचे दुर्दैव म्हणावे लागेल. आता प्रशासन काळात किमान महिला स्वच्छतागृह सुरू होतील, अशी अपेक्षा होती.

पण स्वच्छतागृहांची सांगाडे फक्त उभा करण्यात आले आहेत. ते अशा ठिकाणी केले आहेत की, तिथं कुणीही जाणार नाही तिथे जाण्या-येण्याची सोय करून पाण्याची व्यवस्था करून प्रत्यक्षात वापरण्यासाठी सुरु करणे अपेक्षित होते. परंतू याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. जत शहर हे तालुक्याचे ठिकाण असून येथे मोठी बाजारपेठ आहे. त्यामुळे येथे खरेदी-विक्रीसाठी ग्रामीण भागातून येणाऱ्या महिलांची संख्या मोठी आहे. महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय नसल्याने महिलांची मोठी गैरसोय होत असून भाजी विक्रेत्या महिला मोठ्या प्रमाणात असून त्यांच्या शरीरावर परिणाम होतो.

स्वतंत्र महिला स्वच्छतागृह सुरू करण्यासाठी आंदोलने केल्यावर स्वच्छतागृहांचे सांगाडे खरेदी करून वर्ष उलटले तरी अजून महिला स्वच्छतागृह सुरू केली नाही. त्यामुळे आज हे प्रतीकात्मक आंदोलन करण्यात आले. निधी खर्च करूनही महिलांचे स्वच्छतागृह सुरू करण्यास आर्थिक अडचण म्हणून आम्ही माता भगिनींच्या सोयीसाठी भीक मागून जिल्हाधिकारी यांच्याकडे मनीऑर्डर करत आहे. त्यांनी ते पैसे नगरपालिकेला वर्ग करून स्वतंत्र महिला स्वच्छतागृह सुरू करण्याचे आदेश देऊन माता भगिनींना रक्षाबंधन भेट द्यावी, असे विक्रम ढोणे म्हणाले.

या आंदोलनात शहनाज मुजावर, रंजना साळे, अंबवा माळी, जयश्री साळे, सुनीता पनाळकर, नंदाबाई बिराजदार, सुनीता जाधव, रत्नाबई कोळी, शांताबाई माळी, कमल माळी, महादेवी माळी, कमल शिंदे यांच्यासह लकी पवार, प्रशांत एदाळे, तानाजी कटरे, पापा हुजरे, विलास काळे, आकाराम सरक, पवार, रामचंद्र मदने यांच्यासह भाजी विक्रेत्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.


## राजारामबापू सहकारी बँक लि; पेठ (शेड्युल्ड बँक)

प्रधान कार्यालय पेठ, ता. वाळवा जि. सांगली
फोन नं.- ०२३४२ - २५२१३१
ई-मेलः recovery@rajarambapubank.org

### नमूना ''झेड''
### स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस (नियम १०७ पोट – नियम ११(ड १) नुसार)

ज्याअर्थी खाली सही करणार श्री. रविंद्र आर. पाटील वसुली अधिकारी राजारामबापू सहकारी बँक लि., पेठ (शेड्युल्ड बँक) यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये मागणीची नोटीस खाली नमूद केलेल्या ऋणको याना देवूनही नोटीस मध्ये नमूद केलेली रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे. खाली सही करणार यांनी जप्तीची नोटीस दिली असून पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

खाली नमूद ऋणको यांनी रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणको यांना व सर्व नागरीकांना याप्रमाणे नोटीस देणेत येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणा-याने त्याला/तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७(११(ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार खाली नमूद तारखेला प्रत्यक्ष/सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषकरुन ऋणको यांना व सर्व नागरीकांना सावध करण्यात येते की, खाली नमूद मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करु नये आणि व्यवहार केल्यास राजारामबापू सहकारी बँक लि., पेठ यांच्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज याला अधिन रहावे लागेल.

| अ. नं. | ऋणकोचे नांव | मागणी नोटीस तारीख | दावा रक्कम | जप्तीची तारीख | ताबा घेतलेची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. शहाजी राजाराम पाटील रा. जखिणवाडी. ता. कराड जि. सातारा. | ०९.११.२०२० | १) रु. ६,४१,४०,०६०/- २) रु. ५,३७,१८५/- ३) २३,६२,८९३/- दि. ०१.१०.२०१९ पासुनचे व्याज | १९.१०.२०२२ | २९.०८.२०२३ |

**ताबा घेतलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| अ. नं. | गट नंबर | क्षेत्र हे. आर | आकार रु पैसे | हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १ | १३५/१ | ०.१५.५५ | ४.२० | पूर्ण हिस्सा |

सही/-
रविंद्र आर. पाटील, वसुली अधिकारी
राजारामबापू सहकारी बँक. लि.,पेठ. (शेड्युल्ड बँक)
ता. वाळवा जि. सांगली

दि. ३१.०८.२०२३
ठिकाण - पेठ



सा.बां. विभाग शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्र.क्र./इमारती-२, दिनांक २७ सप्टेंबर, २०१८

**संक्षिप्त ई-निविदा सूचना**
**महाराष्ट्र शासन,**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा**
**रेणुका पेट्रोल पंपाजवळ, सातारा ४१५ ००१**

**ई-मेल पत्ता** - satara.ee@mahapwd.gov.in  **दूरध्वनी/फॅक्स क्रमांक : (०२१६२)२३३७९२**

**अल्पकालावधीची ई-निविदा सूचना क्रमांक ४३ सन २०२३-२०२४(''ब-२''नमुना)**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून निविदेतील अटी व शर्तींची पुर्तता करणाऱ्या पात्र कंत्राटदराकडून खालील कामांकरिता '**ब-२ नमुन्यातील**' बाबनिहाय(Item Rate) दर असलेल्या निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर ''https://mahatenders.gov.in'' येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. **कामाच्या अंदाजपत्रकीय दरामध्ये GST समाविष्ठ नाही. कंत्राटदार यांनी त्यांचा देकार सुद्धा GST वगळून (समाविष्ठ न करता) द्यावयाचा आहे. कंत्राटदार यांना GST देयकाच्या रकमेवर देय दराने स्वतंत्रपणे अदा करण्यात येईल.**

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | कुरवली मांडवखडक दालवडी उपवळे कळकजाई रस्त्याचे बांधकाम फलटण तालुक्याला जोडणारा (प्रजिमा-६७) कि.मी. ०/०० ते २६/४०० ता. फलटण जि. सातारा. | **१७२३.७७** |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक ०१/०९/२०२३ सकाळी १०.०० ते दिनांक १५/०९/२०२३ संध्याकाळी १७.३० वाजेपर्यंत.
निविदा पूर्व बैठक :- दिनांक ०५/०९/२०२३ (बैठकीचे ठिकाण-मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, पुणे सेंट्रल बिल्डींग पुणे) वेळ :- सकाळी ११.०० वाजता.

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. www.mahapwd.gov.in
२. https://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा यांचे कार्यालयातील सूचना फलक.

आपला विश्वासु
सही /-
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा**

**जा.क्र. लेखा/जी-११७/७२५३/२०२३**
**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग**
**सातारा यांचे कार्यालय.**
**दिनांक : २२/०८/२०२३**
डीजीआयपीआर/३२१३/२०२३-२०२४



## ग्रॅव्हिस हॉस्पिटॅलिटी लिमिटेड

GRAVISS HOSPITALITY — QUALITY-PASSION-INNOVATION
सीआयएन : L55101PN1959PLC012761
नोंदणीकृत कार्यालय : प्लॉट नंबर : ए ४ आणि ए ५, खंडाळा एमआयडीसी, फेज-२, केसुर्डी, खंडाळा, सातारा-४१२८०१ महाराष्ट्र.
वेबसाईट : www.gravisshospitality.com दूरध्वनी :०२२-६२५१३१३१
ई-मेल : investors.relations@gravissgroup.com

### ६२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येत आहे की, ग्रॅव्हिस हॉस्पिटॅलिटी लिमिटेड (कंपनी) च्या सदस्यांची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) बुधवार, २७ सप्टेंबर २०२३ रोजी दुपारी १२:३० (भारतीय वेळेनुसार) व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे (व्हीसी) इतर ऑडिओ व्हिज्युअलद्वारे आयोजित केली जाईल. कंपनी कायदा, २०१३ च्या लागू तरतुदी आणि त्याखाली बनवलेले नियम आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया ('सेबी') (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स आणि डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ चे पालन करणारे साधन परिपत्रक क्रमांक १०/२०२२ दिनांक २८ डिसेंबर २०२२, परिपत्रक क्रमांक १४/२०२० दिनांक ०८ एप्रिल २०२०, परिपत्रक क्रमांक १७/२०२० दिनांक १३ एप्रिल २०२०, परिपत्रक क्रमांक २०/२०२० दिनांक ०५ मे, २०२० आणि परिपत्रक क्रमांक ०२/२०२२ दिनांक ०५ मे २०२२ (एकत्रितपणे एमसीएचे परिपत्रक' म्हणून संदर्भित) आणि सेबी परिपत्रक क्रमांक SEBI/HO/CFD/PoD-2/P/CIR/2023/4 दिनांक ५ जानेवारी २०२३ आणि SEBI/HO/CFD/CMD2/CIR/P/2022/62 दिनांक १३ मे २०२२ (सेबी परिपत्रके') (एमसीऐ परिपत्रके आणि सेबी परिपत्रके एकत्रितपणे नोटिसमध्ये नमूद केलेल्या व्यवसायाच्या व्यवहारासाठी परिपत्रके म्हणून संदर्भित आहेत.

एजीएमसाठी बोलावणे, एजीएमच्या नोटिस आणि २०२२–२३ आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल पाठवण्याची प्रक्रिया रीतसर पूर्ण झाली आहे आणि ३१ ऑगस्ट २०२३ रोजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवली गेली आहे, ज्यांचे ईमेल आयडी कंपनी/निबंधकांकडे नोंदणीकृत आहेत आणि ट्रान्सफर एजंट (आरटीए') डिपॉझिटरी पार्टिसिपंट (डीपी), आणि प्रत्यक्ष प्रती त्या भागधारकांना पाठवल्या जातील जे त्यासाठी विनंती करतील. एजीएम सूचना, वार्षिक अहवाल आणि इतर माहिती कंपनीच्या वेबसाइटवरून देखील पाहिली जाऊ शकते. **www.gravisshospitality.com** आणि स्टॉक एक्सचेंजच्या **www.bseindia.com** आणि लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे (एलआयआयपीएल) च्या **https://instavote.linkintime.co.in** वेबसाइटवर पाहता येईल.

एजीएम सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार ई–व्होटिंगच्या स्वरूपात इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानाद्वारे व्यवहार केला जाईल. कंपनीने इन्स्टा व्होटवर रिमोट ई–व्होटिंग सुविधा आणि इन्स्टा मीटवर एजीएमच्या तारखेला ई–व्होटिंग प्रणाली प्रदान करण्यासाठी लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एलआयआयपीएल) ची सेवा गुंतवली आहे. रिमोट ई–मतदान कालावधी रविवार, २४ सप्टेंबर, २०२३ रोजी (सकाळी ०९:००वाजता भारतीय वेळेनुसार) सुरू होईल आणि मंगळवारी २६ सप्टेंबर, २०२३ (सायंकाळी ०५:०० वाजता भारतीय वेळेनुसार). समाप्त होईल. रिमोट ई–व्होटिंग मॉड्यूल लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडद्वारे मतदानांसाठी त्यानंतर अक्षम केले जाईल.

कंपनीने श्री मार्टिनहो फेराओ, (सदस्यत्व क्रमांक एफसीएस ६२२१) प्रो.प्रा. फेराओ अँड असोसिएट्स, कंपनी सेक्रेटरी, छाननीकर्ता म्हणून काम करण्यासाठी, संपूर्ण ई–मतदान प्रक्रियेची (म्हणजेच रिमोट ई–व्होटिंग आणि एजीएममध्ये ई–व्होटिंग) निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने छाननी करण्यासाठी यांची नियुक्ती केली आहे.

शेअरधारकांना/लाभार्थी मालकाच्या नावावर नोंदणीकृत शेअर्सच्या पेड–अप मूल्यावर शेअरधारकांचे मतदानाचे अधिकार २० सप्टेंबर, २०२३ रोजी दिले जातील. कोणतीही व्यक्ती, जो कंपनीचे शेअर्स घेतो आणि पाठवल्यानंतर कंपनीचा सदस्य होतो. कट ऑफ तारखेनुसार नोटिस आणि धारण केलेले शेअर्स वरील तपशीलवार वर्णन केल्यानुसार दूरस्थ ई–मतदान प्रक्रियेचे अनुसरण करू शकतात. ते **www.instatvote.linkintime.co.in** येथे उपलब्ध एफएक्यू आणि ई–व्होटिंग मॅन्युअल देखील पाहू शकतात. **enotices@linkintime.co.in** किंवा **investors.relations@gravissgroup.com** गुंतवणूकदारांना ई–मेल करा.

ज्या सदस्यांनी एजीएमपूर्वी रिमोट ई–व्होटिंगद्वारे आपले मत दिले आहे ते एजीएममध्ये उपस्थित राहू शकतात परंतु त्यांना त्यांचे मत पुन्हा देण्याचा अधिकार नाही. पुढे, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ९१ आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन, २०१५ च्या रेग्युलेशन ४२ नुसार, आम्ही तुम्हाला कळवू इच्छितो की कंपनीचे सदस्य नोंदणी आणि शेअर ट्रान्सफर बुक्स गुरुवार, २१ सप्टेंबर, २०२३ ते बुधवार, २७ सप्टेंबर, २०२३ (दोन्ही दिवसांसह) बंद राहतील, कंपनीच्या ६२ व्या एजीएमच्या उद्देशाने.

सविस्तर प्रक्रिया आणि एजीएममध्ये सामील होण्याच्या पद्धतीसाठी, कृपया एजीएम सूचना पहा.

भागधारकांना ई–वॉलिंग बाबत काही शंका किंवा समस्या असल्यास, तुम्ही मदत विभागाच्या अंतर्गत **https://instavote.linkintime.co.in** वर उपलब्ध वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूएस) आणि Instavote e-Voting मॅन्युअल पाहू शकता. **enotices@linkintime.co.in** वर ईमेल लिहा किंवा आम्हाला कॉल करा: दूरध्वनी: ०२२–४९१८६०००.

ई–व्होटिंगचा निकाल एजीएम संपल्यानंतर दोन कामकाजाच्या दिवसांत घोषित केला जाईल आणि तो एकत्रित छाननीकर्त्याच्या अहवालासह, कंपनीच्या वेबसाईटवर (**www.gravisshospitality.com**) टाकला जाईल. लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एलआयआयपीएल) **https://instavote.linkintime.co.in** आणि बीएसई लिमिटेडला कळवले जाईल.

**ग्रॅव्हिस हॉस्पिटॅलिटी लिमिटेडसाठी,**
**सही/–**
**रोमिल रात्रा**
**सीईओ आणि पूर्ण वेळ संचालक**
**(डीआयएन :०६९४८३९६)**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ३१ ऑगस्ट, २०२३**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, **मुख्य संपादक अशोक विठ्ठल सोनवणे** यांनी शितल प्रिंटर्स, गट नं. ९८१, वाघोली पुणे येथून छापून सातारा कार्यालय : प्लॉट नं. ४ शिवकृपा कॉम्प्लेक्स, रामकृष्ण कॉलनी, सदरबझार, पोवई नाका, सातारा पिन कोड नं. ४१५ ००१, RNI : MAHMAR/२०१२/४१९६७, फोन (०२१६२) २३३४७१ येथून प्रसिध्द केले. ✻ **व्यवस्थापकीय संपादक – रंजन साळवी.** शहर कार्यालय :- २२ गुरुवार पेठ, राजलक्ष्मी टॉकिजसमोर यश चेंबर्स, तिसरा मजला राजपथ, सातारा. ४१५००१, फोन/फॅक्स (०२१६२) २३३४७१, email : lokmanthan.satara@gmail.com. (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहिल).